# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१८५४/२०२०/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. दावल दगा शेवाळे,<br>रा. मु.पो. चौगाव, ता. सटाणा,<br>जि.नाशिक. | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>मालेगाव ग्रामीण उपविभाग, मालेगांव,<br>ता. मालेगांव, जि. नाशिक | अपर पोलीस अधिक्षक,<br>अपर पोलीस अधिक्षक कार्यालय,<br>मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - १८/०८/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०६/०८/२०२० | ---------- | १०/०८/२०२० | २४/०८/२०२० | २४/०८/२०२० | १६/०९/२०२० |

अपिलार्थी यांनी दि. १२/१०/२०२० रोजीच्या अर्जान्वये " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न करता प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात आला आहे " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिल अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- ए.एस.आय. थोरात यांचेवर अतिशय दंडात्मक कारवाई करावी.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जनमाहिती अधिकारी तर्फे प्रतिनिधी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे प्रतिनधी उपस्थित होते व अन्य पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

मा. महोदय, आपल्या कार्यालयात अर्जदार - दावल दगा शेवाळे व गैर अर्जदार-लखमापूर पो. स्टे.चचे ए.एस.आय. राजेश थोरात व अतुल अहिरे यांचे विरुध्द तक्रार संदर्भात पोलीस महासंचालक यांचे कार्यालयातील क्रमांक. पामसं/१५/६८ तक्रार अर्ज/१९७ वि २०१९-S१२७७४/२०११ या संदर्भिय प्राप्त पत्र व जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयातून NAD/१३७०S-१२७७४ S.D.P.O. मालेगांव (ग्रामीण) असे पत्र प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने आपल्या कार्यालयातून काय कारवाई केली गेली आहे. त्यांची माहिती मिळणेबाबत व घेतलेले जाबजबाब त्याबाबत वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना दिलेला अहवाल त्या विषयी संपुर्ण नकला मिळणेबाबत.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र "ब" मध्ये " मा. उपविभागीय अधिकारी यांनी लखमापूर पो.स्टेशन येथील A.S.I. राजेश थोरात यांचेवर फक्त २४ रुपये दंडात्मक कारवाई करुन A.S.I. राजेश थोरात यांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१०/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये अलिलार्थी यांच्या मुळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती पुरविण्यात आलेली आहे.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१६/०९/२०२० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगांव ग्रामीण यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचेबाबतचा आदेश पारीत अपिलार्थी यांचा प्रथम अपिलीय अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

३) सदर सुनावणीस अपिलार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळालेली असल्याचे नमूद केले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिलेली असल्याचे नमूद केले व प्रथम अपिलीय अधिकारी आदेश पारीत करुन अपिलार्थी यांनी माहिती उपल्बध करुन दिलेली असल्याचे अपिलार्थी यांचे समाधान झालेले असल्याबाबत नमूद केलेले आहे.

४) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मालेगांव ग्रामीण उपविभाग, मालेगांव यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविलेली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

५) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, मालेगांव यांनी प्रथम अपील आदेश पारीत केलेला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

६) तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे मुळ अर्जाच्या अनुषंगाने व अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती मिळाली असल्याचे नमूद केलेले आहे वरील प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थी मुळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक सत्यमेव जयते

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** अर्ध-१०७८ 06 MAY 2024